Corporate Communications & Investor Relations
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 495

# वृत्तपत्रीय निवेदन

## वित्तीय वर्ष २०२१ - २२ साठीच्या राज्य वार्षिक पत योजनेची महाराष्ट्र राज्याच्या राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या १५१ व्या तिमाही बैठकीत घोषणा

**पुणे ४ जून २०२१ : महाराष्ट्र राज्याच्या** राज्यस्तरीय बँकर्स समितीची १५१ वी तिमाही बैठक दिनांक ३ जून २०२१ रोजी दूरदृश्य माध्यमातून बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सदर बैठकीत वित्तीय वर्ष २०२० - २१ मधील पिक कर्जाच्या संवितरणातील प्रगती, वित्तीय वर्ष २०२१ - २२ साठी वार्षिक पत योजना, तसेच राज्य व केंद्र शासनाने हाती घेतलेल्या अनेक उपक्रमांची चर्चा करण्यात आली. .

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री उद्धव ठाकरे हे सदर बैठकीसाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते व राज्य शासनाच्या वतीने त्यांनी राज्य स्तरीय बँकर्स समितिला संबोधित केले. कृषी क्षेत्राच्या कर्ज संवितरणात सुधारणा करण्याचा व स्वमदत गटांच्या सहित सर्व शासन पुरस्कृत योजनांना वित्तीय पाठबळ देण्याचा सल्ला त्यांनी सभासद बँकांना दिला. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री अजित पवार, कृषी मंत्री श्री दादाजी भुसे, सहकार मंत्री श्री बाळासाहेब पाटील व कृषी व सहकार राज्यमंत्री श्री विश्वजित कदम यांनी सुद्धा राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या १५१ वी तिमाही बैठकीस मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव श्री सीताराम कुंटे, यांच्यासह सहकार, नियोजन, वित्त, महसूल व कृषी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव व आयुक्त देखील सदर बैठकीला उपस्थित होते. भारत सरकारच्या वित्तीय सेवा विभागाच्या अतिरिक्त सचिव श्रीमती वंदिता कौल, व भारतीय रिझर्व बँक , राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेचे वरिष्ठ अधिकारी, अग्रणी बँक व्यवस्थापक सुद्धा सदर बैठकीत उपस्थित होते.

राज्यातील बँकांनी वित्तीय वर्ष २०२० - २१ दरम्यान रु ४७९७२ कोटी रुपयांची पिककर्जे संवितरीत केले असून गेल्या पाच वर्षातील हे सर्वाधिक संवितरण असल्याचे बैठकीत सादर करण्यात आले. वर्ष २०२१ च्या आगामी खरीप हंगामासाठी सुद्धा राज्यातील बँकांनी अधिकाधिक पिक कर्ज संवितरीत करावे यावर राज्य शासनाने भर दिला व जून २०२१ पर्यंत सदर उद्दिष्ट साध्य करण्याचे निर्देश दिले. महात्मा ज्योतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत कर्ज माफ झालेल्या लाभार्थ्यांना तसेच कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना व्याजदरात सवलत, मान्सूनसाठी अनुकूल असलेली स्थिती हे सभासद बँकांना कृषी क्षेत्राला अधिक कर्ज देण्यासाठी महत्वाचे घटक आहेत व सभासद बँकांनी या संधीचा लाभ घ्यावा असेही बैठकीत सांगण्यात आले. .

सदर बैठकीच्या दरम्यान रु ४,६०,८८१ कोटी रुपयांच्या राज्याच्या वार्षिक प्राधान्य क्षेत्र पत योजनेचे तसेच रु १८,१०,७७९ कोटी रुपयांच्या सर्वसमावेशक वार्षिक पत योजनेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

बँक ऑफ महाराष्ट्रचे सरव्यवस्थापक व महाराष्ट्र राज्याच्या राज्यस्तरीय बँकर्स समितीचे निमंत्रक श्री यु आर राव यांनी बैठकीचे सूत्रसंचालन केले.

Corporate Communications & Investor Relations
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 495